मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 13 एप्रिल 2024 | पान- 1

# आढळरावांना लाखाचे मताधिक्य देणार

## आमदार महेश लांडगे : भाजपच्या समन्वय बैठकीत निर्धार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दहा वर्षांची कारकीर्द चांगली असल्यामुळे तिसऱ्यांदा ते पंतप्रधान होणार आहेतच. त्यांचे हात बळकट करण्यासाठी शिरूर लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव यांना विजय करण्यासाठी आपण सगळे कामाला लागू या. भोसरी विधानसभा मतदार संघातून आढळराव यांना एक लाखापेक्षा अधिकचे मताधिक्य मिळवून देण्याची जबाबदारी माझी असे प्रतिपादन भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी केले.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजप पदाधिकाऱ्यांची समन्वय बैठक घेतली. यावेळी आमदार लांडगे बोलत होते. यावेळी महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार राहुल कुल, आदींसह शिरूर लोकसभेतील भाजपाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान चंद्रशेखर बावनकुळे यांच्या बैठकीमुळे




### आमदार महेश लांडगे यांचा दावा...

आपल्या शब्दाला पक्के असलेल्या आमदार महेश लांडगे यांनी भर सभेत महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव यांना भोसरी विधानसभा मतदारसंघातून लाखाचे मताधिक्य देण्याचा शब्द दिला. शिरूरमधून लोकसभेला तीव्र इच्छुक, पण ही जागाच पक्षाला न मिळाल्याने नाराज असल्याची चर्चा आमदार महेशदादा लांडगे यांनी फेटाळून लावली आणि ही केवळ चर्चाच असल्याचे स्पष्ट केले. गेल्यावेळी 2019 च्या लोकसभेला आढळरावांना भोसरीने शिरूर मतदारसंघात सर्वाधिक म्हणजे 37 हजार 77 मतांची व त्याखालोखाल हडपसरने आघाडी दिली. मात्र, जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरूर या बाकीच्या विधानसभा मतदारसंघात ते पिछाडीवर गेल्याने त्यांचा 58 हजार 483 मतांनी पराभव झाला होता. त्यामुळे या वेळी भोसरीतून एक लाखाचे लीड देऊ, असा दावा महेशदादांनी काल केला.

भोसरी व जुन्नर तालुक्यासह आंबेगाव, खेड, शिरूर, हवेली व हडपसर मधील भाजपा कार्यकर्ते अधिक जोमाने कामाला लागणार असल्याने शिवाजीराव आढळराव यांना अधिक बळ मिळण्यास फायदा होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जगामध्ये भारताचा आदरयुक्त दबदबा निर्माण झाला आहे. राज्यामध्ये महायुती आहे. सगळ्यांच्या विचाराने शिवाजीराव आढळराव यांना शिरूर लोकसभा मतदार संघातून उमेदवारी दिली आहे. त्यांना सर्वाधिक मतांनी विजयी करण्याची जबाबदारी आपली सगळ्यांची आहे. खासदार अमोल कोल्हे या मतदार संघात कधी फिरकले नाहीत. याउलट शिवाजी आढळराव यांनी मागील पाच वर्षात मतदार संघात जास्तीत जास्त कामे केली आहेत. चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेशाध्यक्ष भाजप

आमदार लांडगे यांनी अगदी मनमोकळेपणाने संवाद साधल्याने पक्ष पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे टेन्शन कमी झाले. उमेदवार येण्याच्या अगोदर आपला चेहरा फ्रेश झाला, तर उमेदवार फ्रेश आणि आपणही असे म्हणत त्यांनी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्त्यांना चार्ज केले. एरव्ही त्वेषाने आणि गंभीर बोलणाऱ्या महेशदादांनी काल विनोदी अंगाने जोरदार भाषण केल्याने त्याला बावनकुळे, आढळरावांसह सर्वांनीच मोठी दाद दिली.

महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील खेड मधून लीड मिळाले आहे. यावेळी ही प्रचंड लीड देवू असे पुणे जिल्ह्या प्रमुख भगवानराव पोखरकर यांनी सांगितले. त्यांनी व्यक्त केला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातून ४५ वर खासदार निवडून देण्याचा शब्द दिला आहे. आपले शिरूरचे उमेदवार मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच आहे असे समजून शिवाजीराव आढळराव पाटील यांना लीड देऊन विजयी करायचे आहे. मात्र शिवसेनेच्या सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी गाफील न रहात, दक्षता बाळगत निवडणुकीचे काम करायचे आहे.

# पुणेकरांना उन्हाचे चटके! पारा 41 च्या पुढे वाढला उन्हाचा चटका

## पुढील चार ते पाच दिवसात उन्हाचा चटका, दुपारनंतर ढगाळ वातावरण पावसाची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील उन्हाचा पारा पुन्हा वाढू लागला असून शहराच्या मध्यवर्ती भागातील कमाल तापमान ४०च्या उंबरठ्यावर आले आहे. तर शहरातील उपनगर आणि जिल्ह्यातील काम तापमान 42 अंशापर्यंत पोहचल्यामुळे उन्हाचा चटका आणि उकाडा चांगलाच वाढला आहे. दरम्यान, शहरासह जिल्ह्यात पुढील चार ते पाच दिवसात उन्हाचा चटका आणि दुपारनंतर ढगाळ वातावरण असेल. काही भागात मेघगर्जनेसह पावसाची शक्यताही पुणे वेधशाळेने वर्तविली आहे.

मागील ४८ तासांत ४० अंशापर्यंत खाली आलेले कमाल तापमान पुन्हा ४१ अंशाच्या पुढे गेले आहे. शिरूर येथे



सर्वाधिक ४१.६ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.

शिरूर, वडगावशेरी, कोरेगाव पार्क, मगरपट्टा, पुरंदर, राजगुरूनगर, हडपसर, इंदापूर आणि खेड या भागात कमाल तापमान ४० अंशाच्या पुढे नोंदविण्यात आले आहे.

दरम्यान, शिवाजीनगर, चिंचवड, पाषाण, एनडीए, बारामती, हवेली, आंबेगाव आणि तळेगाव परिसरात कमाल तापमान ३८ ते ४०च्या आसपास असून उकाडा चांगलाच जाणवत आहे. दरम्यान, पुणे शहरासह जिल्ह्यात पुढील दोन दिवस हवामान कोरडे राहील. तर दुपारनंतर आकाश ढगाळ राहणार असून, कमाल तापमानात फारसा बदल होणार नाही, असा अंदाज पुणे वेधशाळेने वर्तविला आहे.

# पुणे महापालिकेला अखेर जाग!

## खासगी रुग्णालयांबाबत उचलली पावले : बहुतांश रुग्णालयांच्या परवान्याच्या नूतनीकरणाची प्रक्रिया पूर्ण

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील सुमारे शंभरहून अधिक खासगी रुग्णालये विनापरवाना सुरू असल्याची बाब समोर आली होती. या रुग्णालयांच्या परवान्याची मुदत ३१ मार्चअखेर संपूनही त्यांनी नूतनीकरण न केल्याचे वृत्त दिले होते. यानंतर महापालिकेच्या आरोग्य विभागाने तातडीने पावले उचलत बहुतांश रुग्णालयांच्या परवान्याच्या नूतनीकरणाची प्रक्रिया पूर्ण केली आहे.

महापालिकेच्या हद्दीत ८४० खासगी रुग्णालये आहेत. त्यातील ४१० रुग्णालयांच्या परवान्याचे नूतनीकरण मार्चअखेरपर्यंत पूर्ण होणे आवश्यक होते. कारण त्यांच्या परवान्याची मुदत ३१ मार्चला संपुष्टात आली. महापालिकेच्या आरोग्य विभागाने २२ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीत यासाठी एक खिडकी योजनेसह विशेष मोहीम राबविली. शहरात ५ मार्चला नूतनीकरण झालेल्या रुग्णालयांची संख्या ३१० आणि नूतनीकरण न झालेल्या रुग्णालयांची संख्या १०० होती. मागील पाच दिवसांत आरोग्य विभागाने शिल्लक राहिलेल्या बहुतांश रुग्णालयांचे परवाना नूतनीकरण पूर्ण केले आहे.

महापालिकेकडून परवान्याचे नूतनीकरण न करणाऱ्या रुग्णालयांवर दंडात्मक कारवाई केली जाते. महापालिकेला ही रुग्णालये बंद करण्याचे अधिकार नाहीत. त्यामुळे वैध परवाना नसताना सेवा देणाऱ्या या रुग्णालयांना दरमहा केवळ १०० रुपये दंड केला जातो. या दंडाची सर्वाधिक रक्कम पाच हजार रुपये आहे. त्यामुळे दंडात्मक कारवाईला ही रुग्णालये जुमानत नव्हती. आरोग्य विभागाने तातडीने पावले उचलत बहुतांश रुग्णालयांचे नूतनीकरण पूर्ण केले आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.



> रुग्णालयांच्या परवाना नूतनीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. परवाना नूतनीकरण राहिलेल्या सर्व रुग्णालयांनाही याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यामुळे सर्व रुग्णालयांच्या परवान्याचे नूतनीकरण पूर्ण झाले आहे.
>
> **- डॉ. भगवान पवार, आरोग्यप्रमुख, महापालिका.**

शहरातील खासगी रुग्णालये
एकूण रुग्णालये – ८४०
यंदा परवान्याची मुदत संपणारी रुग्णालये – ४१०
परवाना नूतनीकरण केलेली रुग्णालये – ३५०
परवाना नूतनीकरण न झालेली रुग्णालये – २८
रुग्णालय बंद करण्याचे प्रस्ताव – ३०

# राज्यात सर्वाधिक मतदार पुणे जिल्ह्यात

## पुण्यातील प्रतिष्ठित गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेत धक्कादायक प्रकार

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राच्या ४८ मतदारसंघातील सुमारे सव्वानऊ कोटी मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून मतदारांची सर्वाधिक संख्या पुणे जिल्ह्यात आहे. तर नंदूरबार, गोंदिया, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांत महिला मतदारांची संख्या अधिक असून त्या सर्वांनी मतदानाचा हक्क बजावला तर त्यांची मते निकालावर प्रभाव पाडू शकतात.

राज्यात ८ एप्रिलपर्यंत एकूण नऊ कोटी २४ लाख ९१ हजार ८०६ मतदारांची नोंद झाली आहे. यामध्ये चार कोटी ८० लाख ८१ हजार ६३८ पुरुष, चार कोटी ४४ लाख चार हजार ५५१ महिला आणि ५६१७ तृतीयपंथी मतदार आहेत.

पुणे जिल्ह्यात सर्वाधिक ८२ लाख ८२ हजार ३६३ मतदार आहेत. त्याखालोखाल मुंबई उपनगरात ७३ लाख ५६ हजार ५९६, ठाणे जिल्ह्यात ६५ लाख ७९ हजार ५८८, नाशिक ४८ लाख आठ हजार ४९९, तर नागपूर जिल्ह्यात ४२ लाख ७२ हजार ३६६ मतदार आहेत. रत्नागिरी, नंदूरबार, गोंदिया आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत महिला मतदारांची संख्या अधिक आहे. नगर, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर या पाच जिल्ह्यांमध्ये ३० लाखांहून अधिक मतदार आहेत. नगरमध्ये ३६ लाख ४७ हजार २५२, सोलापूर जिल्ह्यात ३६ लाख ४७ हजार १४१, जळगावमध्ये ३५ लाख २२ हजार २८९ मतदार आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील मतदारसंख्या ३१ लाख ७२ हजार ७९७ तर छत्रपती संभाजीनगरमध्ये ३० लाख ४८ हजार ४४५ मतदार आहेत. याशिवाय बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, रायगड, मुंबई शहर, बीड, सातारा, सांगली आणि पालघर या दहा जिल्ह्यांमध्ये २० लाखांहून अधिक मतदार आहेत, असे निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आले.

निवडणूक आयोगाकडील माहितीनुसार पुणे जिल्ह्यात सर्वाधिक मतदारांची नोंद आहे, तर चार जिल्ह्यांत महिला मतदारांचा टक्का प्रभावी आहे.



**महिला मतदारांचा प्रभाव**

| जिल्हा | पुरुष | महिला | तृतीयपंथी |
|---|---|---|---|
| रत्नागिरी | ६,३१,०१२ | ६,७२,९१६ | ११ |
| नंदूरबार | ६,३७,६०९ | ६,३९,३२० | १२ |
| गोंदिया | ५,४१,२७२ | ५,५१,२६४ | १० |
| सिंधुदुर्ग | ३,३०,७१९ | ३,३२०२५ | १ |

# अदानी ग्रुपची पिंपरी-चिंचवडमध्ये शेकडो कोटींची गुंतवणूक

## आयटीयन्सची पायाभूत सुविधांकडे लक्ष देण्याची अपेक्षा : वाहतूक कोंडीवरही मार्ग काढण्याच्या आग्रह

**पिंपरी | प्रतिनिधी**

अदानी ग्रुपशी संबंधित कंपनी टेराविस्टा डेव्हलपर्स पिंपरी-चिंचवडमध्ये डेटा सेंटर सुरू करीत असून, फिनोलेक्स इंडस्ट्रीने पिंपरी येथील २५ एकर जमिनीचे लीज हक्क या कंपनीला ४७० कोटी रुपयांना विकले आहेत. दोन वर्षापूर्वी मायक्रोसॉफ्ट कंपनीने पिंपरी येथील फिनोलेक्स कंपनीच्याच जागेवर डेटा सेंटर सुरू करणार असल्याचे जाहीर केले होते. यामुळे रोजगार निर्मिती बरोबरीनेच मोठी गुंतवणूक शहरात येत असल्याने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पीएमआरडीए, एमआयडीसी, त्याचबरोबर पोलीस विभागाने नव्या गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण तयार करण्याची गरज आहे.

सध्या हिंजवडी आयटी पार्क आणि तळवडे आयटी पार्क भागातील रस्ते, कचरा, विद्युत पुरवठा हे प्रश्न दहा-पंधरा वर्षांनंतरही कायम असल्याने किमान आता मुख्य शहरात महापालिका भवनसमोर येणाऱ्या कंपनीसाठी सोयी-सुविधा योग्य असाव्यात अशी सूचना आयटीयन्सकडून केली जात आहे.मोरवाडी (फिनोलेक्स) चौकातील फिनोलेक्स कंपनीच्या जागेतील २५ एकर जागेत मायक्रोसॉफ्ट कंपनी तीन टप्प्यात उभी राहणार असल्याचे यापूर्वी जाहीर केले होते. यासाठी साडेतीनशे कोटी रुपयांची प्राथमिक गुंतवणूक केली जात आहे. या चौकात पुणे मेट्रोचे पहिले स्टेशन हे पिंपरी आहे. त्याचबरोबर चिंचवड, पिंपरी रेल्वे स्टेशन अवघ्या काही मीटर अंतरावर आहे. तसेच विमानतळही नजिक असल्याने या जागेची निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, हे सगळे होत असताना याच चौकात होणारी मोठी वाहतूककोंडी सोडवण्यासाठी उपाययोजना केली




जाणार आहे का? असा सवाल ट्विटरवर विचारला जात आहे.

तळेगाव दाभाडे येथील नियोजित प्रकल्प गुजरात मध्ये गेल्याने मध्यंतरी बराच राजकीय गदारोळ झाला होता. याच तळेगाव दाभाडे एमआयडीसी परिसरात असलेल्या असंख्य समस्यांमुळे, सध्या अनेक कंपन्या त्रस्त आहेत. या सगळ्या पार्श्वभूमीवर मायक्रोसॉफ्ट पाठोपाठच आता अदानी उद्योग समूहाशी संबंधित टेराविस्टा डेव्हलपर्सने शेकडो कोटींची गुंतवणूक केल्याने शहरातील मूलभूत सोयीसुविधा आणि समस्या सोडवण्याची मागणीही होऊ लागली आहे.

अदानी कोनेक्सद्वारे डेटा सेंटर चालवले जाते. २०३० पर्यंत भारतातील टॉप ३ डेटा सेंटर ऑपरेटर बनण्याचे अदानी कोनेक्सचे ध्येय असल्याचे कंपनीने यापूर्वी जाहीर केले होते. पुढील दहा वर्षात १ गिगा वॅट डाटा सेंटर क्षमता विकसित करण्याची योजना आखल्याचेही अदानी ग्रुपने नुकतेच जाहीर केले आहे. अदानी ग्रुपने या डेटा सेंटरसाठी अमेरिकास्थित एज-कोनेक्स कंपनीशी सामंजस्य करार केला आहे. त्याचबरोबर यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या शहरातील विविध शासकीय विभागांनी दिल्या आहेत. अनेक कंपन्या बाहेर जाण्याची कारणे काय याचा अभ्यास करण्याची गरज आहे. पुण्यात एखादी कंपनी येताना वाहतूक कोंडी, कचरा, पाणी या गोष्टींवर प्रथम चर्चा करीत असतात. आता बहुतांश कंपन्यातून वर्क फ्रॉम होम धोरण संपुष्टात आणले आहे. त्यामुळे नव्या कंपन्या शहरात येत असताना त्यांना पोषक वातावरण निर्माण करण्याची शासनाची आणि संबंधित विभागांची जबाबदारी असल्याचे मत आता आयटीयन्स व्यक्त करत आहेत.

# मोशीत जलवाहिनीला गळती

## सेक्टर 11, 13 स्पाईन रस्त्यावरील जलवाहिनी अचानक गळती

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात अपुरा, कमी दाबाने पाणीपुरवठ्याच्या तक्रारींचा ओघ सुरु असतानाच महापालिकेच्या सेक्टर ११, १३ स्पाईन रस्त्यावरील जलवाहिनी अचानक गळती लागली. यामुळे हजारो लीटर पाणी वाया गेले. दुरुस्तीचे काम हाती घेतले असल्याने चऱ्होली, मोशी, डुडुळ गाव, बोऱ्हाडेवाडीसह या वाहिनीवरील पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला आहे. सायंकाळी पाणीपुरवठा होणार नसून शुक्रवारचा विस्कळीत राहणार आहे.



आंद्रा धरणातून मिळणाऱ्या पाण्यात घट झाल्याने शहरातील पाणीपुरवठा आठ दिवस विस्कळीत झाला होता. समाविष्ट गावांसह उपनगरांमध्ये भीषण टंचाई निर्माण झाली होती. बुधवारपासून पूर्वीप्रमाणे ८० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी मिळण्यास सुरुवात झाली आहे. पण, पाणी टंचाईच्या तक्रारी कायम आहेत. त्यातच आता स्पाईन रस्त्यावरील जलवाहिनीला अचानक गळती लागली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी झाली. पाणीपुरवठा विभागाने जलवाहिनी दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. या कामास वेळ लागणार आहे. त्यामुळे जलवाहिनीवरील पाणी पुरवठा बंद करण्यात आला आहे.

या जलवाहिनीवरून होणारा चऱ्होली, मोशी, डुडुळ गाव, बोऱ्हाडे वाडी, चोवीसवाडी, वडमुखवाडी, देहू रस्ता, चक्रपाणी वसाहत, इंद्रायणी नगर, सर्व प्राधिकरण सेक्टर क्रमांक ४,६,९,११, १३ तसेच चक्रपाणी वसाहत, सद्गुरूनगर या सर्व भागाचा पाणी पुरवठा बंद करण्यात आला आहे. काम पूर्ण झाल्यानंतर पाणी पुरवठा चालू करण्यात येईल. या परिसराचा आजचा यापुढील पाणी पुरवठा बंद राहणार आहे. तसेच उद्याचा पाणीपुरवठा हा अनियमित, कमी वेळ, कमी दाबाने आणि विस्कळीत राहील असे पाणीपुरवठा विभागाने सांगितले. गळती लवकरात लवकर काढून पाणी पुरवठा पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन, कार्यकारी अभियंता रामनाथ टकले यांनी केले.

# शिरूरमध्ये ठाकरे गट आक्रमक

## नियोजित दौरा रद्द करण्याची कोल्हेंवर नामुष्की ओढावली

**पिंपरी | प्रतिनिधी**

खेड तालुक्यात शिवसेनेची ताकद मोठी आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या विधानसभेच्या जागावाटपात खेड-आळंदी विधानसभेची जागा शिवसेनेच्या वाट्याला मिळावी, यासाठी आपण आपल्या वरिष्ठ नेत्यांशी विचारविनिमय करून शब्द द्यावा. तोपर्यंत आपल्या प्रचारात सहभागी होणार नाही. अशी स्पष्ट भूमिका ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी घेतल्याने महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अमोल कोल्हे यांना सांडभोरवाडी काळुस जिल्हा परिषद गटातील शुक्रवारी नियोजित असलेला दौरा तातडीने रद्द करण्याची नामुष्की ओढावली आहे.



भाजपचे खेड आळंदी विधानसभा समन्वक आणि जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अतुल देशमुख यांनी पाच दिवसांपूर्वी भाजपला राम राम ठोकला. तर शुक्रवारी त्यांनी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश केला. या सर्व प्रक्रियेत महाविकास आघाडीचे उमेदवार खासदार अमोल कोल्हे यांनी प्रमुख भूमिका बजावली होती.

या प्रवेशामुळे कोल्हे यांनी देशमुख यांना विधानसभेचा शब्द दिला असावा. असे संकेत मिळत मिळाल्यानंतर ठाकरे गटात अस्वस्थता पसरली असल्याची माहिती समोर येत आहे. त्यानंतर संध्याकाळी ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी थेट कोल्हे यांचं घरं गाठलं. या बैठकीत शिवसैनिकांकडील इच्छूक उमेदवारांपैकी भलतीच नावं पुढे केल्याचं समजत आहे. ही सर्व बैठक गुपित झाली. मात्र खात्रीशीर सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ही माहिती समोर आली आहे.

महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांची पाहता कोल्हेंना आपला प्रचार थांबवण्याची नामुष्की ओढावली आहे. आता या मतदारसंघात आघाडीत निर्माण झालेला पेच कोल्हे आणि नेते मंडळी कशा पद्धतीने सोडवतात. याकडे सगळ्याचं लक्ष लागून राहिलं आहे. यातच विधानसभेसाठी खेड-आळंदीची जागा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना देण्याचा शब्द वरिष्ठ नेत कार्यकर्त्यांना देणार का? याकडे आता मतदारसंघांचं लक्ष लागून राहिलं आहे.

# जलतरण तलाव, वॉटर पार्क होणार बंद!

## बेकायदेशीर पाणी भरणा केंद्रे : वाहने धुण्याची केंद्रे तातडीने बंद करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणसाखळीत गेल्या वर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला. परिणामी यंदा धरणांमधील पाणीसाठ्यात घट झाली आहे. त्यामुळे जिल्हा, शहर, उपनगर भागातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी जिल्हा, महापालिका हद्दीतील जलतरण तलाव आणि वॉटर पार्कची माहिती (मॅपिंग) संकलित करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. पाण्याचे नियोजन करावे लागणार असल्याने येत्या काही दिवसात वॉटर पार्क आणि जलतरण तलाव बंद केले जाण्याची शक्यता आहे.

बेकायदेशीर पाणी भरणारी केंद्रे, वाहने धुण्याची केंद्रे तातडीने बंद करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. गरज भासल्यास जिल्ह्यात सुरू असलेली बांधकामेही थांबण्याचा इशारा दिला जाणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने कारवाई सुरू केली असून अद्यापही पुणे महापालिका आणि पीएमआरडीएकडून कारवाई सुरू झालेली नाही.

जिल्ह्यातील पाणीटंचाईबाबत जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि जिल्हा महापालिकांसोबत जलसंपदा विभागाची बैठक घेतली. यावेळी त्यांनी पाणी साठ्याचा आढावा घेताना बारामती, पुरंदर नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना पाण्याची बचत, अपव्यय टाळण्याच्या सूचना केल्या. त्यामुळे पाण्याची बचत करण्यासाठी अनधिकृत कार सर्व्हिसिंग सेंटर्स बंद करा. आवश्यकता भासल्यास सुरू असलेले बांधकाम बंद करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

राज्यातील प्रमुख धरणांमधील पाणीसाठा ३४.५१ टक्क्यांवर गेल्याचे जलसंपदा विभागाच्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे. दरम्यान, पुणे आणि पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळी आणि पवना धरणांमध्ये अनुक्रमे ३६.२० आणि ३६.४२ टक्के पाणीसाठा आहे. जिल्ह्यात पाण्याचे संकट गंभीर होत असून भविष्यातील पाणीटंचाईसाठी जिल्हा प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे.

पुणे विभागात सध्या ४०७ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. दरम्यान, पुण्यातील ७६ गावे आणि ५०० वस्त्यांना ९७ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे.



> कडक उन्हाळ्यामुळे पाण्याची मागणी वाढली आहे. ग्रामीण भागात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. धरणांमधील उपलब्ध पाणी शहरी भागाला उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शहरी भागातून पाणी वाचवल्यास मे महिन्यात ग्रामीण भागाला पाणी देणे शक्य होईल. दैनंदिन पाणी वापरावर बारीक लक्ष ठेवण्याचे, अवैध पाणी भरण्याचे केंद्र बंद करणे, वाहने धुण्याची केंद्रे बंद करणे, आणि बांधकामांना फक्त प्रक्रिया केलेले पाणी द्या.
>
> **- डॉ. सुहास दिवसे, पुणे जिल्हाधिकारी.**

> खडकवासला आणि पवना धरणातील पाणीसाठा कमी होत असून, १५ जुलैपर्यंत त्याचा कसा वापर करता येईल, याचा आढावा जिल्हा प्रशासनाने वेळोवेळी घेतला. गेल्या वर्षी कमी झालेल्या पावसामुळे पाणीसाठा मर्यादित आहे. त्यामुळे पाणीवापरावर नियंत्रण ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी दिले होते. त्यामुळे आतापासून आम्ही काळजी घेत आहोत. आमच्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करत आहोत.
>
> **- नंदकिशोर जगताप, पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख, पुणे महापालिका.**

पुरंदर तालुक्यात सर्वाधिक ५१ टँकर आहेत. यानंतर बारामतीत २१ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून पुण्यासह राज्यात पाणीटंचाई जाणवत आहे. त्यामुळे खडकवासला आणि पवना धरणातील पाणी किमान पावसाळा सुरू होईपर्यंत म्हणजेच १५ जुलैपर्यंत वापरण्याचे नियोजन जिल्हा प्रशासन करत आहे. दरम्यान, पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि जिल्ह्यातील नगरपालिकांसह ग्रामपंचायतींना पाणी काटकसरीने वापरण्याचे निर्देश दिले आहेत.

दरमहा टंचाई आराखडा!

जिल्ह्यातील ८१ गावांमधील ५३३ गावांना १०८ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे. एकूण १,६४,०२५ नागरिक बाधित असून ३१ विहिरी प्रशासनाने ताब्यात घेतल्या आहेत. उन्हाळा सुरू झाल्यानंतर पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जिल्हा टंचाई आराखडा तयार केला जातो. मात्र, यंदा दुष्काळी परिस्थिती असल्याने तीन महिन्यांचा स्वतंत्र आराखडा तयार करण्यात येणार आहे. दर महिन्याला टंचाई आराखडा मासिक बैठकीत मांडला जाणार आहे.

# शिक्षिकेकडून विद्यार्थ्यास लाथा बुक्यांनी बेदम मारहाण

## नववीतील मुलाला लाथाबुक्यांनी मारहाण : पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

'छडी लागे छम छम विद्या येई घम घम' हे दिवस जाऊन आता शाळेत हसत-खेळत शिक्षण प्रणाली आहे. परंतु त्यानंतर काही शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना मारहाण केली जाते. आता शिक्षणाचे केंद्र असलेल्या पुण्यातून धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना महिन्यापूर्वी घडली आहे. परंतु त्याचा व्हिडिओ आता व्हायरल झाला आहे. एका शिक्षिकेने विद्यार्थ्याला जबरदस्त मारहाण केली आहे. लाथाबुक्यांनी ही मारहाण केली आहे. वर्गात दंगा करत असल्याचे पाहून ही मारहाण झाली आहे. दरम्यान या प्रकरणात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली आहे.

पुण्यातील एका नामवंत शाळेत ही घटना घडली आहे. या संदर्भात मुलाच्या पालकाने पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, माझा मुलगा शिकत असलेल्या शाळेतील एक शिक्षक रजेवर होते. त्या शिक्षकांच्या जागी पूजा केदारी या शिक्षिका वर्गात आल्या. त्यावेळी काही मुले घोळका करुन बसले होते. शिक्षक आल्यावर सर्व मुले जागेवर जाऊन बसले.

परंतु पूजा केदारी यांना राग आला. त्यांनी तक्रारदार पालकाच्या मुलास मारहाण सुरु केली. अगदी लाथा-बुक्यांनी मारहाण केली. मागील महिन्यात हा प्रकार घडला होता. त्यावेळी मुलाने हा प्रकार सांगितला नाही. परंतु मुलास मारहाण केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने तो माझ्या पाहण्यात आला. त्यानंतर मुलाकडे विचारणा केली असता त्याने सविस्तर प्रकार सांगितला, असे पालकांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.



**पोलिस ठाण्यात तक्रार**

याबाबत विद्यार्थ्यांच्या पालकांनी विश्रामबाग पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे. पूजा केदारी यांनी यापूर्वी मुलांना मारहाण केल्याचा आरोप त्यांनी तक्रारीत केला आहे. या शिक्षिकेवर बडतर्फीची कारवाई करावी, अशी मागणी पालकांनी केली आहे.